**पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण**
पोलीस मुख्यालय आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१०, E.Mail- pilcbnskr@gmail.com

---

**प्रेसनोट** दिनांक:- १०/०९/२०१८

## ग्रामीण पोलीस अधीक्षकांच्या संकल्पनेतुन जिल्हयात यंदाही ''विघ्नहर्ता बक्षीस योजना'' डॉल्बी मुक्त गणेश उत्सव साजरा करण्याचे आवाहन

---

गतवर्षी ग्रामीण पोलीस दलातर्फे जिल्हयातील गणेशमंडळांसाठी **''विघ्नहर्ता बक्षीस योजना''** यशस्वीतरित्या राबविण्यात आली होती. विघ्नहर्ता बक्षीस योजनेअंतर्गत उत्कृष्ट गणेश आरास व कार्यक्रम सादर करणारे गणेश मंडळांना **नाशिक जिल्हयाचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री मा.ना. श्री. गिरीषजी महाजन सो.** यांचे हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले होते. नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री.संजय दराडे सो** यांचे संकल्पनेतुन जिल्हयातील गणेशोत्सव मंडळांसाठी यंदाही **''विघ्नहर्ता बक्षीस योजना''** राबविली जाणार आहे. जिल्हयातील सार्वजनिक गणेश उत्सव शांततेत पार पडावे, जनतेमध्ये जातीय सलोखा कायम रहावा, तसेच गणेश उत्सव मंडळांनी विशेषत: तरूणांनी सामाजिक बांधीलकीची जाणीव ठेवुन सामाजिक एकोपा वृध्दींगत होईल असे संदेश समाजात प्रसारित करावे यासाठी नाशिक ग्रामीण पोलीस दलाकडुन **सन २०१८ गणेश उत्सवाचे** दरम्यान आदर्श गणेश उत्सव मंडळांची निवड करून उत्कृष्ठ मंडळास विघ्नहर्ता बक्षीस योजनेअंतर्गत पुरस्कृत करण्यात येणार आहे.

विघ्नहर्ता बक्षीस योजने अंतर्गत जिल्हयातील पोलीस ठाणे स्तर व उपविभागीय स्तरावर **''विघ्नहर्ता मंडळ परिक्षण समिती'' स्थापन** करण्यात आली आहे. सदर समित्यांमध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली पोलीस ठाणे कार्यक्षेत्रातील प्रतिष्ठीत व्यक्ती, डॉक्टर, प्राध्यापक, शिक्षक, अल्पसंख्यांक सदस्य, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते व सेवाभावी संस्थांचे पदाधिकारी यांची निवड करण्यात आली असुन महिला सदरस्यांचाही समावेश असेल. परिक्षण समितीने पोलीस ठाणे कार्यक्षेत्रातील सार्वजनिक गणेश मंडळांना भेटी देवुन सजावट, उत्कृष्ट सांस्कृतिक कार्यक्रम, राष्ट्रीय एकात्मतेवर आधारीत देखावे, बेटी बचाव, ग्राम स्वच्छता अभियान यावर आधारित देखावे / कार्यक्रम सादर करणा-या गणेश उत्सव मंडळांची गुणानुक्रमे माहिती घेवुन आदर्श गणेश मंडळाचा अहवाल जिल्हास्तरीय परिक्षण समितीस सादर केला जाईल. जिल्हास्तरीय परिक्षण समितीचे अध्यक्ष अपर पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण यांनी निवड केलेल्या **एकुण ०५ आदर्श गणेशोत्सव मंडळांना** गुणानुक्रमांक देवुन प्रथम, व्दितीय, तृतीय व दोन उत्तेजनार्थ असे बक्षिस प्रदान करण्यात येणार आहे.

पोलीस ठाणे व उपविभागीय स्तरावर नेमण्यात आलेली परिक्षण समितीची कार्यकारणी विघ्नहर्ता बक्षीस योजनेअंतर्गत आदर्श गणेश उत्सव मंडळांची निवड करतांना खालील मार्गदर्शिकेचा अवलंब करून माहिती सादर करणार आहे.

| **अ.नं.** | **विवरण** | **गुण** |
|---|---|---|
| १ | मंडळाने धर्मदाय आयुक्त, पोलीस दल यांचेकडुन आवश्यक परवानगी घेतली आहे काय ? | १० |
| २ | मंडळाचा स्टेज, प्रकाश व्यवस्था, विजेची पर्यायी व्यवस्था केलेले आहे. | १० |
| ३ | मंडळामुळे रहदारीस / वाहतुकीस अडथळा निर्माण निर्माण होतो आहे अगर कसे ? | १० |
| ४ | मंडळाने आयोजित केलेला देखावा / सांस्कृतिक कार्यक्रम यांचा विषय, दर्जा व शिस्त | १० |
| ५ | पोलीसांनी घातलेल्या अटी व नियमांचे करण्यात आलेले पालन व पोलीसांना सहकार्य | १० |
| ६ | मंडळाने गर्दी नियंत्रण करण्यासाठी, शिस्त राखण्यासाठी व श्रींच्या मुर्तीचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना केली आहे काय ? | १० |
| ७ | मंडळाने दर्शनाकरीता महिला व पुरूषांकरीता वेगवेगळी रांग तयार केली आहे काय ? | १० |
| ८ | गणेश मंडळाने सुरक्षेकरीता वापरलेली सुरक्षा विषयक यंत्रणा/उपकरणे (धातुशोधक यंत्र) इत्यादी व्यवस्था आहे काय ? | १० |
| ९ | ध्वनी प्रदुषणाबाबत दिलेल्या मर्यादेचे पालन कशा प्रकारे केले आहे, पर्यावरण जागरूकता देणारा संदेश दिला आहे काय ? | १० |
| १० | ध्वनी बाबत वेळेचे बंधन पाळतात काय ? | १० |

नाशिक ग्रामीण जिल्हयातील गणेश उत्सव शांततेत पार पडावा यासाठी सर्व पोलीस ठाणे कार्यक्षेत्रातील गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी, शांतता कमिटी, पोलीस मित्र सदस्य, प्रतिष्ठीत नागरीक यांच्या बैठका घेण्यात आलेल्या असुन आदर्श गणेशोत्सव मंडळ स्पर्धेत सहाभागी होणेविषयी मार्गदर्शन करण्यात आले आहे. तसेच गणेश उत्सवादरम्यान मंडळांच्या मंडपातील साउंड सिस्टीम अथवा डी.जे. सिस्टीमचे आवाजामुळे होणारे ध्वनी प्रदुषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस स्टेशन स्तरावर विशेष पथक स्थापन करण्यात आले असुन **नॉईज मीटरचे सहाय्याने ध्वनी मर्यादेपेक्षा जास्त आवाज ठेवणा-या मंडाळांवर कारवाई** करण्यात येणार आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो** यांनी जनतेस आवाहन केले आहे की, गणेश उत्सव शांततेत पार पडावा यासाठी पोलीस दलास सहाकार्य करावे तसेच ध्वनीप्रदुषण होणार नाही यासाठी सर्व सार्वजनिक गणेश मंडळांनी **डी.जे./ डॉल्बी मुक्त संकल्पना** राबवावी. तसेच **एक गाव एक गणपती** ही संकल्पना राबवुन सर्व गणेश मंडळांनी एकत्र येवुन गणेश उत्सव साजरा करावा असे आवाहन करण्यात येत आहे.